| MHWS090009402023 | |
|---|---|
| | दाखल तारीख : ०५/०९/२०२३ |
| | नोंदणी तारीख : ०५/०९/२०२३ |
| | निकाल तारीख : ०७/०४/२०२६ |
| | कालावधी : **०२** वर्षे **०७** महिने **०२** दिवस |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्रमांक २), मानोरा यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी तृष्णा गो. बन्सोड)

**कौ.हिं.का.अर्ज क्रमांक २२/२०२३** **निशाणी क्र. ३२**

१. **सौ. जया आकाश खडके**
वय अं.: २५ वर्ष, धंदा : घरकाम

२. **अरुण आकाश खडके**
वय अं.: ३ वर्ष, धंदा : – निल

३. **शिवम आकाश खडके**
वय अं.: १ वर्ष, धंदा : निल
(अ.क्र.२ व ३ करीता अ.पा.क.आई अ.क्र.१)
सर्व रा. पोहरादेवी, ता. मानोरा, जि.वाशिम. ..... अर्जदार

**..विरुद्ध..**

१. **आकाश पांडूरंग खडके,**
वय अं.: ३० वर्ष, धंदा : शेती,

२. **सौ. सुशिला पांडूरंग खडके**
वय अं.: ५५ वर्ष, धंदा : शेती,

३. **पांडूरंग बळीराम खडके**
वय अं.: ६० वर्ष, धंदा : शेती,

४. **रवि पांडूरंग खडके**
वय अं.: ३५ वर्ष, धंदा : शेती,

५. **सौ. शोभा रवि खडके**
वय अं.: ३० वर्ष, धंदा : शेती,

६. **महादेव पांडूरंग खडके**

वय अं.: २८ वर्ष, धंदा : शेती,

७. **शंकर पांडूरंग खडके**

वय अं.: २५ वर्ष, धंदा : शेती,

रा. आमकिन्ही, ता.मानोरा, जि.वाशिम.

सर्व रा. चिखली इजारा, ता. आर्णि, जि.यवतमाळ. ..... गैरअर्जदार

**अर्ज :– महिलांचा घरगुती हिंसाचारा पासुन संरक्षण कायदा, २००५ चे कलम १२ ते २४ नुसार**

.......................................................................................................... ...

**काम पाहिले :–** अर्जदारांतर्फे विधिज्ञ – श्री. एस. पी. गावंडे

गैरअर्जदारांतर्फे विधिज्ञ – श्री. जी. पी. ठाकरे

..........................................................................................................

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक : ०७/०४/२०२६)

अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की,

अर्जदार क्र.१ (यांना यापुढे फक्त अर्जदार म्हणून संबोधण्यात येईल) हिचे लग्न गैरअर्जदार यांचेसोबत दि. ०२/०५/२०२० रोजी मौजा–चिखली इजारा, ता.आर्णि, जि.यवतमाळ येथे संपन्न झाले. लग्नानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार हिला फक्त एक वर्षापर्यंत चांगली वागणुक दिली. त्यानंतर गैरअर्जदार हे नेहमी शुल्लक शुल्लक कारणांवरुन तिचेसोबत भांडण तंटा करुन पैशाणी मागणी करीत होते. तसेच गैरअर्जदार हा अर्जदार हिला 'तु दिसायला चांगली नाही, मला दुसरे लग्न करावयाचे आहे व मुला तुझ्यापासून फारकती पाहिजे असे म्हणून तिला शारिरीक व मानसिक त्रास देत होते. अशातच अर्जदार हिला गैरअर्जदार पासून अर्जदार क्र.२ व ३ अशी दोन अपत्ये जन्माला आली. सदर दोन्ही अपत्ये अर्जदार हिचेसोबतच राहत आहेत. त्यानंतर अर्जदार हिला गैरअर्जदारांनी पैशाची मागणी करुन मारहाण केली व तिला माहेरी पाठवून दिले. मागील एक वर्षापासून अर्जदार ही तिच्या मुलाबाळांसह माहेरी राहत आहे. त्यानंतर दि.१६/०८/२०२३ रोजी अर्जदार हिला पंचांनी गैरअर्जदाराच्या घरी घेवून गेले असता गैरअर्जदारांनी एक लाख रुपये आणले असेल तर आम्ही तिला वागवितो नाहीतर वागविणार नाही असे म्हटले. दि.२५/०८/२०२३ रोजी गैरअर्जदार हा दारु

पिवून आला व अर्जदार हिला बेदम मारहाण केली व तिला माहेरी पाठवून दिले. गैरअर्जदार याचेकडे मौजा चिखली इजारा येथे सहा एकर ओलिताची शेती असून त्यापासून तो वर्षाकाठी दहा लाख रुपये कमवितो. तसेच गैरअर्जदार हा इतर कामे करुन महिन्याकाठी पंधरा हजार रुपये कमवितो. त्यामुळे अर्जदार हिने गैरअर्जदाराचे विरूध्द संरक्षणात्मक आदेश, निवासस्थान, नुकसान भरपाई, आर्थिक सहाय्य व घरभाडे आणि खर्चासह अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. गैरअर्जदार यांनी आपले म्हणणे नि.क्र१९ वर दाखल केले आहे. गैरअर्जदारांचे म्हणणेप्रमाणे अर्जदार ही त्यांच्या एकत्र कुटुंबात नांदावयास आल्यानंतर सुरुवातीचे काही दिवस चांगली राहली. त्यानंतर अर्जदार ही गैरअर्जदार यांना त्यांच्या कुटुंबापासून वेगळे होण्याच्या कारणावरुन वाद उपस्थित करीत होती. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार यांना ''तु मला सुरुवातीपासूनच पसंत नाही, परंतु माझे आई–वडीलांनी जबरदस्तीने तुझेशी माझा विवाह लावून दिला, त्यामुळे मला तुझेशी संसार करण्यात रस नाही'' असे म्हणून मानसिक त्रास देत होती. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार यांना त्यांच्या कुटुंबियांपासून वेगळे होवून तिच्या माहेरी घर जावई म्हणून वास्तव्यास राहण्यासाठी तगादा लावित होती व त्या कारणावरुन त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांसोबत वाद उपस्थित करीत होती. अर्जदार ही गैरअर्जदार यांना न सांगता त्यांच्या माघारी माहेरी निघून जात होती. अर्जदार तिचे जावाई यांनी गैरअर्जदार यांच्याशी वाद उपस्थित करुन गैरअर्जदार यांना शिवीगाळ करुन त्यांचे अंगावर मारण्यासाठी आले व त्यांची गच्ची पकडून ''आम्ही तुला जीवाने मारुन टाकतो, आमचे कोणीही वाकडे करु शकत नाही'' अशी धमकी दिली. गैरअर्जदार च्या वडीलांनी अर्जदार ला नांदण्यास येण्याकरीता विनंती केली असता तिने येण्यास नकार दिला. गैरअर्जदार हे मुलांना भेटण्याकरीता व अर्जदार ची समजुत काढण्याकरीता आले असता अर्जदार व तिच्या आई–वडीलांनी गैरअर्जदार ला त्यांच्या मुलांना भेटू दिले नाही व नांदण्यास येण्याकरीता स्पष्ट नकार दिला व घटस्फोटाची मागणी केली.

३. गैरअर्जदार पुढे असे कथन करतात की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला नांदावयास येण्याबाबत दि.२०/०७/२०२३ रोजी रजिस्टर पोष्टाने नोटीस पाठवून देखील अर्जदार ही नांदावयास आली नाही. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार यांना सातत्याने खोट्या प्रकरणात गोवण्याच्या धमक्या देत आहे. गैरअर्जदार हे अर्जदार यांना नांदविण्यास तयार असून अर्जदार ही कोणतेही कारण नसतांना नांदण्यास येण्याकरीता टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे

नाईलाजास्तव त्यांचे वैवाहिक संबंध पुनस्थापित होवून मिळण्याबाबत गैरअर्जदाराने वि. दिवाणी न्यायाधिश साहेब (क. स्तर), आर्णि यांच्या न्यायालयात दावा दाखल केला आहे. गैरअर्जदार यांचेकडे कोणतीही शेतजमीन नसुन तो शेतमजुरी करतो. त्यांना १०० ते १५० रुपये मजुरी मिळते. त्यांना मिळणाऱ्या रोजमजुरीतून स्वतःचा व म्हाताऱ्या आई–वडीलांचा उदरनिर्वाह करावा लागतो. याउलट अर्जदार ही शिवणकाम करीत असून त्यापासून ती १०००/– रुपये रोज कमविते. त्यामुळे ती स्वतःचा व मुलांचा उदरनिर्वाह करण्यास समक्ष आहे. तसेच अर्जदार स्वमर्जीने कोणतेही कारण नसतांना माहेरी राहत आहे. वरील कारणास्तव गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा अर्ज खारीज करण्याची विंनती केली.

**४.** अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञ श्री.एस. पी. गावंडे यांचा अंतिम युक्तीवाद ऐकला. गैरअर्जदारतर्फे कोणताही युक्तीवाद करण्यात आला नाही. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले. अशा परिस्थितीत खालील वाद प्रश्न माझे विचारार्थ आहे. खाली दिलेल्या कारणास्तव त्यांचे समोरील निष्कर्षा पर्यंत पोहोचले.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला, हे अर्जदाराने सिध्द केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| २. | अर्जदार कौटुंबिक हिंसाचारापासुन स्त्रीयांचे संरक्षण कायद्याचे कलम १८ अंतर्गत संरक्षण आदेशास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| ३. | अर्जदार वरील कायद्याचे कलम १९ अंतर्गत तिने मागणी केल्याप्रमाणे निवा–याच्या (घरभाडे) आदेशास पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| ४. | अर्जदार वरील कायद्याचे कलम २० अंतर्गत तिने मागणी केल्याप्रमाणे आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ५. | अर्जदार वरील कायद्याचे कलम २२ अंतर्गत नुकसान भरपाई मिळविण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी** |
| ६. | अर्जदार वरील कायद्याचे कलम २१ प्रमाणे स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहे काय ? | **नकारार्थी** |
| ७. | काय आदेश ? | **अंतिम आदेशानुसार** |

## कारणमीमांसा

५. अर्जदाराने आपले म्हणने सिध्द करण्याकरीता स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.२७ वर दाखल केले. अर्जदाराने तीचे समर्थनार्थ गै.अ.क्र.३ चे नावे असलेला भुमापन क्र.५/२/१ चा सातबारा उताऱ्याची संगणीकृत प्रत नि.क्र.२८ व लग्नपत्रिका आर्टिकल–अ दाखल केली आहे. गैरअर्जदाराने अर्जदार हिचा उलटतपास घेतला नाही. प्रकरणात गैरअर्जदारातर्फे पुरावा दाखल करण्यात आला नाही. अर्जदाराने पुरसिस नि.क्र.२९ दाखल केली व तीचा पुरावा बंद केला. मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय ***रजनेश – विरुध्द – नेहा*** **[क्रिमीनल अपिल नं. ७३०/२०२० दिनांक ०४.११.२०२०]** प्रमाणे अर्जदाराने तिचे संपत्ती व दायीत्व या संबंधीचे शपथपत्र नि.क्र.२४ वर दाखल केले.

**मुद्दे क्रमांक १ व २ करीता**

६. वरील मुद्दे ऐकमेकांशी संबंधीत असल्याने चर्चे करीता एकत्रीत विचारात घेतले. अर्जदार हिने शपथपत्र नि.क्र.२७ मध्ये अर्जातील मजकूरांची पुनरावृत्ती केली. गैरअर्जदाराने त्यांचा उलट तपास घेतला नाही. तसेच त्याने त्याचा पुरावा सुध्दा दिला नाही. त्यामुळे अर्जदार हिच्या पुराव्यास छेद जाईल अशी कुठलीही बाब अभिलेखावर आली नाही. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.२ ते ७ यांचेविरुद्ध कथित हिंसा पुरक पुराव्याअभावी सिद्ध झालेली नाही. या सर्व बाबीं वरुन असे निर्दशनास येते की, अर्जदार कौटुंबिक हिंसाचारास बळी पडल्याचे सिध्द होते. म्हणून अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याचे विरूध्द संरक्षण आदेशास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दे क्रमांक ३ व ४ करीता**

७. सदरील मुद्दे ऐकमेकांशी संबंधीत असल्यामुळे चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेतले. गैरअर्जदार हे अर्जदार हिचे पती व अ.क्र.२ व ३ यांचे वडील असल्याने त्यांच्या पालनपोषणाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी त्याचेवर आहे. गैरअर्जदार याने अर्जदारांच्या पालनपोषणाची व्यवस्था केल्याचे अभिलेखावरुन दिसुन येत नाही. वर चर्चा केल्याप्रमाणे अर्जदार हिच्या पुराव्यास छेद जाईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. अर्जदारार क्र.१ हिने तिच्या शपथपत्रात नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदार शेती करीत असून त्यापासून तो वर्षाला दहा लाख रुपये उत्पन्न कमवितो. परंतु अर्जदाराने गैरअर्जदाराचे

वरीलप्रमाणे उत्पन्न दर्शविणे करीता कूठलाही कागदोपत्री पुरक पुरावा दाखल केला नाही. अर्जदाराने केलेल्या विविध मागण्या आणि गैरअर्जदारांची आर्थीक परिस्थिती यांचेमध्ये समतोल असणे गरजेचे आहे. पोटगीची रक्कम ठरवितांना अर्जदार आणि गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती, राहणीमान, जीवन जगण्यासाठी येणारा किमान खर्च, वादाचे स्वरूप, दोघांची कथने, उपलब्ध कागदपत्रे तसेच वर नमूद केल्याप्रमाणे संपत्ती व दायीत्व बाबतचे शपथपत्र या काही महत्वाच्या बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती लक्षात घेता गैरअर्जदार याने एकत्रीतरित्या अर्जदार ते ३ यांना दरमहा रुपये ४०००/- आर्थीक सहाय्य म्हणून अर्ज दाखल तारखे पासुन दयावे असा आदेश पारीत करणे न्यायोचित होईल. त्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक ४ चे निष्कर्ष 'अंशतः होकारार्थी' नोंदविण्यात येते.

८. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, अर्जदार ही सध्या तिचे माहेरी राहात आहे. प्रस्तुत प्रकरणात ती कथीत ठिकाणी राहत असल्याची बाब सिध्द झाली आहे. त्यामुळे तिला निवासस्थानाकरीता खर्च किंवा घरफाडे देणे योग्य होणार नाही. प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती लक्षात घेवून त्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्रमांक ५ करीता</u>**

९. अर्जदार कौटुंबिक हिंसाचारास बळी पडल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती लक्षात घेता गैरअर्जदार याने अर्जदार हिला नुकसान भरपाई म्हणून एकत्रीतरित्या रक्कम रुपये ५०००/- दयावे असा आदेश पारीत करणे न्यायोचित होईल, त्या अनुषंगाने मुद्दा क्रमांक ५ चे निकर्ष 'अंशतः होकारार्थी' नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्रमांक ६ करीता</u>**

१०. अर्जदाराने तिचे स्त्रीधन कोणते व ते गैरअर्जदाराच्या ताब्यात असल्याचे सिद्ध केलेले नाही. म्हणून अर्जदाराने मागणी केलेप्रमाणे स्त्रीधन परत मिळविण्यास पात्र नाही. करीता मुद्दा क्र.६ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्रमांक ७ करीता</u>**

११. वर चर्चा केल्या प्रमाणे तसेच मुद्दे क्रमांक १ ते ६ ला नोंदविण्यात आलेल्या निष्कर्षा वरुन अर्जदाराचा अर्ज खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो. त्याअनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार याने अर्जदार ते ३ यांना आर्थिक सहाय्य म्हणून दरमहा एकत्रितरित्या रक्कम रुपये ३०००/–(तिन हजार रूपये फक्त) अर्ज नि.क्र.१ दाखल तारखे पासुन दयावे.

३. गैरअर्जदार याने स्वतः किंवा कोणास प्रवृत्त करून अर्जदार यांचा कोणताही शारिरीक, मानसिक, भावनात्मक कौटुंबिक हिंसाचार करु नये असा संरक्षण आदेश पारीत करण्यात येतो.

४. गैरअर्जदार याने अर्जदाराला नुकसान भरपाई म्हणून एकत्रीतरित्या रक्कम रुपये ५०००/– (पाच हजार रूपये फक्त) दयावे.

५. गैरअर्जदार याने अर्जदाराला प्रकरणाचा खर्च म्हणून रक्कम रुपये ५०००/– (पाच हजार रूपये फक्त) दयावे.

६. न्यायनिर्णयाची प्रत अर्जदार, गैरअर्जदार, संबंधीत पोलीस ठाणे अधिकारी आणि संरक्षण अधिकारी यांना निःशुल्क पुरविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.04.07 13:45:32 +0530

मानोरा
दि. ०७.०४.२०२६

**(तृष्णा गो. बन्सोड)**
न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),
(न्यायालय क्र.२), मानोरा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan (Grade-III) |
| Court | - | (Smt. T. G. Bansod)<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Manora. |
| Date of Judgment/Order | - | 07/04/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 07/04/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 07/04/2026 |